आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

४ फेब्रुवारी २०२६ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत-अमेरिका व्यापार कराराला वर्षभराच्या चर्चेनंतर अंतिम स्वरुप दिल्याचं वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांचं आज लोकसभेत निवेदन

- राष्ट्रपतींच्या अभिभाषणाबद्दल आभार प्रस्तावावरच्या चर्चेला प्रधानमंत्री आज लोकसभेत उत्तर देणार

- भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची द्वैमासिक आढावा बैठक आजपासून सुरू

- राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करत असून, राजकीय जुळवाजुळव करण्यावर नाही,असं शरद पवार यांचं प्रतिपादन

**आणि**

- मुंबई पुणे एक्सप्रेसवे वर टँकर उलटल्याने वाहतुकीचा खोळंबा

**<><><><><><>**

भारत - अमेरिका व्यापार कराराविषयी वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी आज लोकसभेत निवेदन दिलं. या करारात भारताला आपल्या महत्त्वाच्या क्षेत्रांचं हित साधण्यात यश आल्याचं गोयल यांनी सभागृहाला सांगितलं. कृषी, दुग्धव्यवसाय या क्षेत्रांना याचा मोठ्या प्रमाणात फायदा होईल, सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांसाठी नव्या संधी निर्माण होतील असं गोयल यांनी नमूद केलं. पीयूष गोयल बोलत असताना विरोधी पक्षाच्या सदस्यांनी जोरदार घोषणाबाजी केली. या गदारोळातच गोयल यांनी आपलं निवदेन पूर्ण केलं.

दुपारी दोन वाजता सभागृहाचं कामकाज तिसऱ्यांदा सुरू झाल्यावर राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेला सुरुवात झाली.

भाजपा खासदार निशीकांत दुबे यांनी विविध पुस्तकांचा दाखला देत काँग्रेसच्या दिवंगत नेत्यांवर टीका केली. पीठासीन अधिकाऱ्यांनी त्यांना पुस्तकांचा दाखल न देण्याविषयी सांगितलं, मात्र त्यांनी भाषण सुरूच ठेवलं, यामुळे विरोधी बाकांवर गदारोळ वाढल्यामुळे सभागृहाचं कामकाज संध्याकाळी पाच वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं.

त्याआधी सकाळी सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यावर सभापती ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास पुकारला. त्याचवेळी विरोधी पक्षाच्या सदस्यांनी विविध मुद्दे उपस्थित करत घोषणाबाजी सुरू केली. केंद्रीय ग्राहक व्यवहार, अन्न आणि सार्वजनिक वितरण राज्यमंत्री निंबुबेन बांभनिया यांनी या गदारोळातच उत्तर देण्याचा प्रयत्न केला. मात्र गदारोळ वाढत गेल्यानंतर कामकाज बारा वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आज संसदेत राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरल्या आभार प्रस्तावावरल्या चर्चेला उत्तर देणार आहेत.

**<><><><><><>**

वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल पत्रकार परिषद घेऊन भारत-अमेरिका व्यापार कराराविषयी निवेदन देणं हा संसदीय परंपरेचा भंग असल्याची टीका काँग्रेस खासदार प्रमोद तिवारी यांनी राज्यसभेत केली. अधिवेशन सुरू असताना धोरणात्मक मुद्द्यांवर सभागृृहाच्या बाहेर चर्चा करणं सभागृहाच्या नियमांचा भंग आहे, असं तिवारी म्हणाले. राज्यसभा अध्यक्ष सी. पी. राधाकृष्णन यांनी तिवारी यांचा प्रस्ताव फेटाळून लावला.

**<><><><><><>**

परीक्षा पे चर्चा हा प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचा विद्यार्थ्यांशी संवादाचा कार्यक्रम येत्या शुक्रवारी सकाळी १० वाजता प्रसारित होणार आहे. तणावमुक्त वातावरणात परीक्षा देण्याचं महत्त्व तसंच मनाची शांतता, आत्मविश्वास वाढवणं आणि

आव्हानांवर मात करणं यासाठीचे उपाय याविषयी प्रधानमंत्री विद्यार्थ्यांशी बोलले आहेत.

<><><><><>

भारतीय रिझर्व्ह बँकेच्या पतधोरण समितीची तीन दिवसांची बैठक आजपासून सुरू झाली. रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर संजय मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली सहा सदस्यांची पत आणि वित्त धोरण समिती येत्या शुक्रवारी द्वैमासिक आढावा जाहीर करेल.

<><><><><>

आज जागतिक कर्करोग दिवस. जनसामान्यांमध्ये कर्करोगाबद्दल जागरुकता वाढावी आणि त्याला प्रतिबंध करण्यासाठी कशी काळजी घ्यावी, या आजाराचं लवकर निदान आणि उपचारांबाबत जागरुकता निर्माण व्हावी, यासाठी दरवर्षी ४ फेब्रुवारीला दिवस पाळला जातो. ‘युनायटेड बाय युनिक’ अशी यंदाच्या जागतिक कर्करोग दिनाची संकल्पना आहे. त्यावर आधारित विविध कार्यक्रम आज आयोजित करण्यात आले आहेत.

<><><><><>

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष संघटना मजबूत करण्यावर लक्ष केंद्रीत करत असून, राजकीय जुळवाजुळव करण्यावर नाही, असं पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी स्पष्ट केलं आहे. ते आज बारामती इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस पक्षांच्या विलीनीकरणाबाबत विचारण्यात आलं असता त्यांनी ही प्रतिक्रिया दिली. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या विलिनीकरणाशी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा संबंध नाही, दिवंगत अजित पवार यांची जयंत पाटील यांच्याबरोबर याविषयी चर्चा झाली होती, असं ते म्हणाले. सुनेत्रा पवार यांना उपमुख्यमंत्रीपदाची संधी मिळाल्याबद्दल आनंद व्यक्त करताना, अपघाताच्या चौकशीसंदर्भात सरकारनं योग्य निर्णय घ्यावा, असंही पवार यांनी सांगितलं.

अमेरिका आर्थिकदृष्ट्या शक्तिशाली देश असून, जर अमेरिकेतील कृषी उत्पादनं भारतात आली तर त्याचा भारतीय शेतकऱ्यांवर विपरीत परिणाम होऊ शकतो, अशीही चिंता पवार यांनी व्यक्त केली.

**<><><><><><>**

राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्षाची घोषणा लवकरच केली जाईल, अशी माहिती प्रदेशाध्यक्ष सुनिल तटकरे यांनी दिली आहे. मुंबईत ते वार्ताहरांशी बोलत होते. सुनेत्रा पवार यांच्या माध्यमातून पक्षाला मजबूत करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचेही ते म्हणाले. विलिनीकरणाच्या मुद्द्यावर भाजपाशी चर्चा आवश्यक असल्याचा पुनरुच्चार तटकरे यांनी आज केला.

**<><><><><>**

राज्यातले शेतकरी हे अर्थव्यवस्थेचा कणा असून शेतीवर अवलंबून  असलेल्या हजारो कुटुंबांमध्ये महिलांची भूमिका निर्णायक असल्याचं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलं. शाश्वत शेती, महिला सक्षमीकरण आणि ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या बळकटीकरणासाठी काल गोदरेज ॲग्रोव्हेट आणि महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला, त्यावेळी ते बोलत होते.  या करारामुळे राज्यातल्या ९ कापूस उत्पादक जिल्ह्यांतल्या ५ हजारांहून अधिक महिला शेतकऱ्यांना शाश्वत आणि आधुनिक शेती पद्धतींचं प्रशिक्षण मिळणार आहे.

**<><><><><><>**

प्रदूषण करणाऱ्या कंपन्यांना कोकणात थारा देणार नाही, जनतेच्या आरोग्याशी खेळ होऊ देणार नाही, अशी ग्वाही उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे  दिली आहे. ते आज रत्नागिरीत जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या

निवडणुकीसाठी काल आयोजित प्रचारसभेत बोलत होते. सिंधुदुर्ग जिल्ह्यातही कुडाळ इथं काल सायंकाळी उशिरा एकनाथ शिंदे यांची प्रचार सभा झाली. सिंधुदुर्ग जिल्हा परिषदेचा अर्थसंकल्प २० कोटीवरून १०० कोटी रुपयांवर नेण्याचं आश्वासन त्यांनी यावेळी दिलं.

<><><><>

नवी मुंबई विमानतळाला लोकनेते दि. बा पाटील यांचं नाव देण्याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस टाळाटाळ करत आहेत, असा आरोप काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी केला आहे. त्यांनी काल रायगड जिल्ह्यात जासई, चिरनेर, सातिर्जे, चोंढी इथं प्रचार रॅलीत भाग घेतला. यावेळी ते म्हणाले, की जिल्हा परिषदेची ही निवडणूक भूमिपुत्रांच्या हक्कांसाठी आहे. आपली परंपरा कायम राखण्यासाठी एकसंध रहा आणि काँग्रेस मविआच्या उमेदवारांना विजयी करा, असं आवाहन त्यांनी केलं.

<><><><><><>

उद्योगपती अनिल अंबानी यांच्या मालकीच्या कंपन्यांशी संबंधित फसवणुकीच्या प्रकरणांची चौकशी वेगाने करावी, त्याकरता विशेष तपास पथकाची स्थापना करावी, असे निर्देश सर्वोच्च न्यायालयाने आज सीबीआय आणि ईडीला दिले. अनिल अंबानी यांच्या अनेक कंपन्यांमध्ये सार्वजनिक निधीचा गैरवापर, आर्थिक विवरणांमध्ये फेरफार केल्याचा आरोप करणाऱ्या जनहित याचिकेवर आज सरन्यायाधीश न्यायमूर्ती सूर्यकांत, न्यायमूर्ती जॉयमाल्य बागची आणि न्यायमूर्ती विपुल पांचोली यांच्या पीठासमोर सुनावणी झाली.

<><><><><><>

महाराष्ट्रात मुंबई पुणे एक्सप्रेस वे वर खंडाळा घाटात ज्वलनशील पदार्थाचा टँकर उलटल्याने घाट भागात रस्ता वाहतूक ठप्प झाली आहे. वाहनांच्या लांबचलांब रांगा लागल्या असून सुमारे १८ तास खोळंबा झाला आहे. वाहतूक नियंत्रण कक्षाने सांगितलं की काल संध्याकाळी ५ च्या सुमारास ज्वलनशील वायू घेऊन जाणारा टँकर उलटला. तेव्हापासून दोन्ही बाजूने सुमारे १२ किलोमीटरपर्यंत वाहनं अडकली आहेत. राष्ट्रीय आणि राज्यआपत्ती प्रतिसाद दलं तसंच भारत पेट्रोलियम कंपनीची पथकं परिस्थिती हाताळत आहेत. आज संध्याकाळ पर्यंत वाहतूक पूर्ववत होईल असा अंदाज असून, वाहनचालकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा असं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

<><><><><>

आशियाई बॅडमिंटन सांघिक विजेतेपद स्पर्धेत भारताच्या महिला संघाने म्यानमाचा ५ विरुद्ध शून्य अशा गुणफरकाने पराभव करुन विजयी सलामी दिली. चीनमधे क्विंगडो इथं सुरु असलेल्या या स्पर्धेच्या एकेरी गटात तन्वी शर्मा, रक्षिताश्री संतोष रामराज आणि मालविका बनसोड यांनी आपापले सामने जिंकले . दुहेरीमधेही भारतीय संघाने दोन्ही सामने जिंकले. पुढच्या लढती थायलंडच्या संघाबरोबर उद्या होणार आहेत.

<><><><>

जागतिक क्रिकेटची मातृसंस्था समजल्या जाणाऱ्या मेरीलेबोन क्रिकेट क्लबने क्रिकेटच्या ७३ नियमांमध्ये बदल केले आहेत. या नियमांनुसार क्रिकेटमध्ये कनिष्ठ गटासाठी आणि महिला खेळाडूंसाठी चेंडूचा आकार वेगवेगळा असेल. तसंच, बॅटच्या वाढत्या किंमतीना आळा घालण्यासाठी लॅमिनेटेड बॅटना परवानगी, जाणूनबुजून अपूर्ण धावा केल्या तर दंडात्मक कारवाई, सीमा ओलांडून झेल

घेण्यासाठीच फक्त एकच संधी अशा नियमांचा समावेश आहे. त्याखेरीज नोबॉल, हिटविकेट, ओव्हर थ्रो यांमधल्या नियमांमध्येही बदल करण्यात आले आहेत.
यातले अनेक नियम आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषद आयसीसीने आधीच स्वीकारले आहेत.

**<><><><><>**

क्रिकेटमध्ये अंडर नाईन्टिन विश्वचषक स्पर्धेत आज भारताचा सामना अफगाणिस्तानविरुद्ध होत आहे. झिम्बाब्वेमध्ये हरारे इथे सुरू असलेल्या या सामन्यात अफगाणिस्तानने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी स्वीकारली आहे.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा अफगाणिस्तानच्या 31 षटकांत 2 बाद147 धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

धाराशिवच्या कळंब - ढोकी परिसरात आज सकाळी साडेनऊच्या सुमारास भूगर्भातून दोन प्रचंड मोठे आवाज आले. जिल्हा प्रशासनाने याबाबतची माहिती त्वरित राष्ट्रीय भूगर्भविज्ञान केंद्राकडे पाठवल्यानंतर हा भूकंप नाही, असं स्पष्ट झालं आहे. अफवांवर विश्वास ठेवू नये, असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी केलं आहे.

**//<><><><><>//**